# मराठीशी जुळलेली नाळ परदेशातही कायम

## ‘एनआरआय’नी जागविला मातृभाषेचा अभिमान

**सुशांत सांगवे :** सकाळ वृत्तसेवा

यशवंतराव चव्हाण साहित्य नगरी (चिपळूण), ता. १३ : “व्यवसायाच्या निमित्ताने मायभूमीपासून दूर राहत असलो, तरी मराठीशी जुळलेली आमची नाळ आजही कायम आहे. मराठी खरोखरीच अंत:करणाला भिडणारी भाषा आहे,” अशा शब्दांत ‘एनआरआय’नी मराठी भाषेचा अभिमान आज येथे जागविला.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समोरापाच्या सकाळच्या सत्रात ‘विदेशातील मराठीचा जागर’ हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यात अनिल नेने (लंडन), संतोष अंबिके (सिंगापूर), मंदार जोगळेकर (अमेरिका), हसन चौगुले (कतार) हे ‘एनआरआय’ सहभागी झाले होते. साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होत्या. चौगुले म्हणाले, “ इंग्रजी भाषेत शिक्षण अनिवार्य असताना कतारमध्ये मातृभाषेच्या प्रेमापोटी मराठी शाळा सुरू केली.” जोगळेकर म्हणाले, “मातृभाषेवर असलले प्रेम तोडता येत नाही. परदेशात गेल्यावर ते अधिक घट्ट होते, हे आम्ही अनुभवले आहे.”